DONG 3
DONG 3+4

प्रकाश गोळे

# माणूस हा जैविक विविधतेचा भाग आहे?

माणूस हा जैविक विविधतेचा भाग आहे की नाही, हा प्रश्न माझ्या मनात उभा राहिला एक इंग्रजी पुस्तक वाचताना. या पुस्तकाचे नाव आहे "पीपल्स ॲन्ड प्रोटेक्टेड एरिआज" आणि ते आशिष कोठारी, नीना सिंग व सक्सेनी सुरी यांनी संपादित केलेले आहे. यांतील "प्रोटेक्टेड एरिआज" म्हणजे वन्य जीवन संरक्षण कायद्यान्वये संरक्षित केलेली अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने. "पीपल्स" म्हणजे या संरक्षण क्षेत्रांमुळे ज्यांच्या हक्कांवर गदा आली आहे, ज्यांच्या पारंपरिक जीवनपद्धती विस्कळीत झाल्या आहेत किंवा ज्यांना विस्थापित व्हावे लागले आहे असे लोक. ही संरक्षित क्षेत्रे राष्ट्रीय क्षेत्रफळाचा केवळ ४ टक्के भाग व्यापतात. त्यांचा उद्देश असा आहे की त्यामधील वनस्पती, जीवजंतूसह सर्व जैविक विविधता, नैसर्गिक परिसंस्था व भौगोलिक वैशिष्ट्ये यांचे संरक्षण व्हावे. या वन्य जीवांबरोबरच या संरक्षित क्षेत्रांत माणसेही मोठ्या संख्येने राहतात, नैसर्गिक परिसंस्थांचा वापर करतात आणि त्यांत परिवर्तनही घडवून आणतात. याशिवाय वाहतूक, पर्यटन, व्यापारी संकुले, कारखानदारी, खाणकाम, नागरीकरण अशा विविध प्रकारांनी आधुनिक अर्थव्यवस्थाही या संरक्षित क्षेत्रांवर परिणाम करीत असते.

जीवशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता चित्र असे दिसते की माणूस विरुद्ध भारतात राहणारे लाखो प्रकारचे (वनस्पतींसकट) इतर वन्य जीव यांच्यातील हा लढा आहे. माणूस ही एकच प्रजाति आज तिच्या उपयोगासाठी ~~स~~ भारताचे सुमारे ९६ टक्के क्षेत्रफळ वापरीत आहे. आता काहींचे म्हणणे असे आहे की या प्रजातीतील काही भाग खरोखर इतर वन्य जीवांसारखा आहे. त्यामुळे या जीवांसाठी राखून ठेवलेल्या क्षेत्रातील काही भागाचा उपभोग घेण्याचा त्यांना हक्क असला पाहिजे.

अशा रीतीने या प्रश्नाची मांडणी केली तर ही मागणी अन्याय्य वाटते. आदिवासी आणि इतर पारंपरिक जमातींच्या हक्कांसाठी लढणाऱ्या मानवतावादी संघटना अशी मागणी करतात, याचे आश्चर्य वाटते. ~~अ~~न्यायबुद्धी असे सुचविते की आधुनिक अर्थव्यवस्था ज्या ९६ टक्क्यांसारख्या प्रचंड क्षेत्रफळावर हक्क सांगते, त्या क्षेत्रापैकी काही भाग आपल्या उपयोगासाठी मिळाला पाहिजे, अशी मागणी या संघटनांनी करायला हवी. ज्यांना मानवी व्यवस्थेत कोणते हक्क नाहीत, त्यांच्या क्षेत्रावर त्यांनी आक्रमण करणे योग्य नाही.

पण असे घडलेले नाही. त्यामुळे आज या ४ टक्क्यांच्या छोट्या क्षेत्रफळाला आत्यंतिक आक्रमक आणि सर्वभक्षक अशा आधुनिक अर्थव्यवस्थेचा रेटा जाणवतोच पण तथाकथित धरणी-

च्या पूर्तीसाठी मागण्या पुरवाव्या लागतात. शेवटी या दोन्हींचा परि-
-णाम एकच होणार आहे. हे निकृष्ट क्षेत्रही मानवाच्या कह्यात
जाणार, त्यामुळे निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती, कीटक, पक्षी आणि
प्राणी यांना जीवनास आवश्यक अशी जागा व द्रव्ये कमी होणार
आणि त्यांपैकी कित्येक भारतातून नष्ट होणार!

असे दारुण भविष्य वर्तविणे बरोबर का चूक? माझ्या
मते फारसे चूक नाही. कारण या दोन्ही बाजू घेणाऱ्या लोकांनी,
म्हणजे आधुनिक अर्थव्यवस्थेद्वारे जनकल्याण साधू पाहणाऱ्यांनी
आणि वन्य जमाती वगैरे तळागाळातल्या लोकांच्या हक्कांसाठी उभे
राहणाऱ्यांनी, या प्रश्नाला साकल्याने विचार केलेला दिसत नाही.
खरा प्रश्न असा आहे की, माणूस हा नैसर्गिक किंवा जैविक विवि-
-धतेचा भाग मानायचा की नाही?

आशिष कोठारी यांनी आपल्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकर-
-णात या दोन्ही बाजूकडून मांडल्या जाणाऱ्या निरनिराळ्या मुद्द्यांचा
चांगला परामर्श घेतला आहे. कोठारी म्हणतात की आधुनिक अर्थ-
व्यवस्थेचा पुरस्कार करणारे समाजातील उच्चभ्रू असे जे लोक आहेत
ते निसर्गाकडे प्राय: एक उपभोग्य वस्तू किंवा कच्चा माल असे पाह-
-तात. त्यामुळे सध्याच्या कायद्यांचे स्वरूप असे आहे की त्यांपैकी ९५
टक्के, निसर्गव्यवस्था ताब्यात घेऊन त्यांचा वापर करण्यासंबंधी आहेत;
आणि केवळ ५ टक्के निसर्ग-व्यवस्थांच्या संरक्षणासंबंधी आहेत. त्या-
-वरून निसर्ग-व्यवस्था ताब्यात घेऊन त्यांचा वापर करण्याला आजच्या
शासन व्यवस्थेत असाधारण महत्त्व आहे, हे लक्षात येते. सर्व राज-
-कीय पक्ष आणि बहुतेक पुढारीही याच गोष्टींना महत्त्व देतात.
त्यामुळे आजच्या शासन व्यवस्थेत एखाद्या निसर्ग-व्यवस्थेला
संरक्षण देणे अतिशय जिकिरीचे होते. याउलट तिचे संरक्षण काढून
घेणे सोपे जाते. तसेच निसर्ग-व्यवस्थेसाठी संरक्षित केलेल्या जागेत
खाणी, कारखाने, सुरक्षा उपक्रम, हॉटेले अशा गोष्टींना परवानगी
देणेही फारसे अवघड जात नाही.

त्यामुळे निसर्ग-व्यवस्थांसंबंधीच्या सरकारी धोरणातही
भरपूर धरसोड दिसून येते. राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये निर्माण
करण्यामागील उद्देश जरी निसर्ग-व्यवस्था संरक्षित करण्याचा असला
तरी त्यातील क्षेत्र खाणी, धरण-योजना, पुनर्वसन योजना यासाठी
वापरण्याचा आग्रह राजकीय पक्षांकडून व पुढाऱ्यांकडून नेहमीच
धरला जातो. राज्य सरकारांकडून केंद्र सरकारवर दडपण आणले जाते आणि
कार्यभाग साधून घेण्यात येतो. तसेच एखादे क्षेत्र संरक्षित करताना
आजच्या सरकारी यंत्रणेला त्यामध्ये राहणाऱ्या लोकांचे हक्क काढून
घेणे सोपे जाते. त्यांचे पुनर्वसन करणे मात्र कित्येकदा कायमचेही

समाधानकारक नसते. काहींच्या मते फार थोड्या संरक्षित क्षेत्रांतून स्थानिक जमातींना पूर्णपणे बाहेर काढून लावलेले आहे. पण अनेकांचे भवितव्य अनिश्चित आहे, विस्थापित होण्याची तलवार त्यांच्या डोक्यावर सतत टांगती आहे, यात शंका नाही. त्याशिवाय संरक्षित क्षेत्रांचे आजचे व्यवस्थापन असे आहे की स्थानिक जमातींना त्यांच्यापासून कोणताही फायदा होत नाही. पुष्कळशा संरक्षित क्षेत्रांच्या व्यवस्थापनात असेही दिसून येते की वन्य जीवांचे संरक्षण करण्यापेक्षा पर्यटनापासून जास्त पैसा कसा मिळेल याकडे जास्त महत्त्व देण्यात येते. यामुळे संरक्षित क्षेत्रांच्या निर्मितीमुळे स्थानिक लोकांना तोटा सहन करावा लागतो, या मानवतावादी संघटनांच्या म्हणण्यात बरेच तथ्य आहे यात शंका नाही.

त्यांच्या जमिनी आज अभयारण्यांसारख्या संरक्षित क्षेत्रात येतात, असे हे लोक आहेत तरी कोण? मानवतावादी संघटनांच्या मते या क्षेत्रांचे मूळचे रहिवासी आणि मालक म्हणजे हे लोक. मूळचे रहिवासी याचा अर्थ मात्र सावधपणाने समजला पाहिजे. काहीजण म्हणतात, मूळचे रहिवासी स्वतः तर तिथल्या वनस्पती, पक्षी, प्राणी हे होत. मानवाच्या कितीतरी आधीपासून पृथ्वीवर त्यांचा वावर आहे. मात्र त्यांना त्यांच्या जागेवरील हक्क किंवा कसलाच इतर हक्क कायद्याने संमत केलेला नाही. आदिवासींच्या धार्मिक रूढी, चालीरीती आचार हे मात्र काही वनस्पती व काही पक्षी-प्राणी यांचे असे हक्क अप्रत्यक्षपणे मान्य करतात. अशा रूढी आणि आचार-विचार व त्याभोवती गुंफलेली आदिवासी जीवनपद्धती हेच शेवटी जंगलांचे रक्षण करतील, असे मानवतावादी संघटना म्हणतात. अशा प्रकारच्या आदिवासी जमाती आज मुख्यतः मध्य प्रदेश, केरळ-तामिळनाडूचा काही भाग आणि ईशान्येकडील राज्ये यांमध्ये आढळतात. मात्र महाराष्ट्रासारख्या उद्योगप्रधान व इतर बाबतीतही प्रगतिपथावर असलेल्या राज्यात त्यांची संख्या अल्प आहे. प्रवीण परदेशी हे प्रशासकीय अधिकारी लिहितात की महाराष्ट्रातल्या प्रत्येक संरक्षित क्षेत्रात सरासरी ११,६७० लोक राहतात. दर चौरस किलोमीटर क्षेत्रात लोकसंख्येचे प्रमाण ३ (नवेगाव) पासून १९५० (बोरिवली) एवढे बदलते. याशिवाय संरक्षित क्षेत्रात गुरांची संख्याही मोठी आहे. उदाहरणार्थ, मराठवाड्यातील किनवटमध्ये दर चौरस किलोमीटरमागे ६७ गुरे आहेत, तर मेळघाटमध्ये १३ गुरे आहेत. यांमध्ये शेळ्या-मेंढ्यांची संख्या धरलेली नाही. त्यांची संख्या ताडोबामध्ये दर चौरस किलोमीटरमागे २१ आहे तर पेंचमध्ये २५ आहे. एकूण संरक्षित क्षेत्रांपैकी ५८ टक्के क्षेत्रात भरपूर जंगलतोड चालते तर ६७ टक्के क्षेत्रातून किरकोळ वन्य माल (मायनर फॉरेस्ट प्रोड्यूस) गोळा केला जातो. याशिवाय संरक्षित क्षेत्रांना काही भाग रहदारीचे रस्ते, खाणी,

धरण-योजना व कालवे आणि पर्यटकांसाठी सुखसोयी यांनी व्यापलेला दिसतो. इतर राज्यांतील संरक्षित क्षेत्रांची परिस्थितीही यापेक्षा निराळी नाही. स्थानिक जनतेचे हक्क मान्य केलेले असोत वा नसोत, देशाच्या एकूण क्षेत्रफळापैकी केवळ चार टक्के असलेल्या या चिमुकल्या भागातही मानवी हस्तक्षेप सार्वत्रिक आहे, सर्रास आहे, यात शंका नाही. केवळ निसर्गाचे अधिराज्य अशी त्यांची स्थिती आजिबात नाही.

अशा परिस्थितीत जर तुम्ही वन्य जीवांची बाजू घेतलीत आणि मानवाने त्यांचे मूलभूत, नैसर्गिक हक्क मान्य केले पाहिजेत, असं म्हटलं तर सभ्य भाषेत तुम्हाला "मूलभूत पर्यावरणवादी" असं संबो-धलं जातं, तर राजकारणाच्या किंवा सडेतोड भाषेत तुम्हाला चक्क मानवद्रोही ठरविण्यात येतं. पण या चिमुकल्या क्षेत्राची सद्यस्थिती पाहता, स्थानिक जनतेचे हक्क मान्य करण्यापेक्षा वन्य जीवांना जगण्याचा हक्क मान्य करून हे क्षेत्र त्यांच्यासाठी राखून ठेवणं, जास्त न्याय्य वाटतं. माणसं अन्यत्र जगू शकतात, वन्य जीवांची स्थिती माणसांइतकी लवचिक नसते. त्यांना जगण्यासाठी विशिष्ट आसरा लागतो. पुनर्वसनाचा आज-पर्यंतचा कटु अनुभव जमेस असल्याने मानवतावादी संघटनांचा आग्रह असा असतो की स्थानिक जनतेला पर्यायी व्यवस्था नको आहे आणि दिली जाऊ नये, त्यांनी ती स्वीकारू नये. म्हणजेच या स्थानिक जन-तेला जैविक विविधतेचा अविभाज्य भाग म्हणून समजले जावे, असा त्यांचा आग्रह असतो, असं म्हटलं तर वावगं होणार नाही.

मात्र जैविक विविधतेचं संरक्षण बाह्य जगतापासून तिला निराळं काढल्याशिवाय, बाह्य जगताचा हस्तक्षेप कमीतकमी असल्याशि-वाय खऱ्या अर्थानं होत नाही. यासाठी आपल्या अभयारण्यांमध्ये पूर्ण संरक्षित (कोअर) आणि निमसंरक्षित (बफर) असे विभाग पाडलेले अस-तात. स्थानिक जनता जैविक विविधतेचा भाग समजायची तर तिच्यासंबंधीही अशी अलिप्तपणाची भूमिका घ्यावी लागेल. हे कितपत शक्य आहे? कोणीच याबाबत नक्की काही बोलत नाही. शासन यंत्रणेला आखून दिलेले धोरण असे आहे की या जनतेचे पुनर्वसन संरक्षित क्षेत्राबाहेर करावे. मात्र त्यासाठी आवश्यक ते अधिकार व पुरेसा निधी त्यांना क्वचितच दिला जातो. त्याबरोबर क्षेत्र संरक्षित केल्यामुळे उपलब्ध होणाऱ्या नोकऱ्या, पर्यटन-सुविधांमुळे होणारे फायदे यांमध्ये स्थानिक जनतेला अग्रक्रम दिला पाहिजे, असेही त्यांना सांगण्यात येते. मानवतावादी संघटना एकीकडे स्थानिक जनतेची जीवनपद्धती अबाधित राहिली पाहिजे, संरक्षित क्षेत्रातील जैविक उत्पादनात (बायोमास) त्यांना वाटा मिळाला पाहिजे, असा आग्रह धरतात, तर दुसरीकडे त्यांच्यासाठी सर्वमान्य शिक्षण, आधुनिक औषध-पाण्याच्या सोयी, रस्ते व इतर दळणवळणाच्या तरतुदी असाव्यात असा

प्रयत्न करतात. तसेच वृक्षांची लागवड, सामाजिक वनीकरण, शेती सुधारणा, सुधारित चुली, सूर्यशक्तीचा वापर, बायोगॅस, कलाकौशल्याचे शिक्षण, पाणलोट योजनांमध्ये सहभाग या गोष्टींसाठी त्यांच्यासाठी आग्रह धरतात. यामुळे त्यांच्या मूळ जीवनपद्धतीत फरक पडणार, मूळ जीवनपद्धतीला ओत-प्रोत अनुस्यूत असलेल्या जैविक उत्पादनावरचा त्यांचा हक्क सांगणे, हे शक्य होणार नाही, याचा साकल्याने कोणी विचार केलेला दिसत नाही. वरील सर्व सुधारणा त्यांना आधुनिक जीवनपद्धतीच्या आणि विशेषत: बाजारी अर्थव्यवस्थेच्या जवळ नेणाऱ्या आहेत. वन्य जीव ज्या निसर्ग-व्यवस्थांचा वापर करतात, त्यांतील त्यांना सहभाग कमी होत जाणार आहे.

कुसुम कर्णिक यांनी स्थानिक जमातींचा दृष्टिकोन त्यांच्या भाषेत मांडला आहे. ते म्हणतात की या लोकांच्या घरात धान्यधुन्य भरलेले असेल, त्यांच्या जनावरांना चारा असेल, त्यांच्या नातेवाईक-मित्रांमध्ये त्यांना वावर असेल, तर ते पूर्ण समाधानी असतील. बाजारात गेल्यावर तिथल्या वस्तू आपल्याला विकत घेता येत नाहीत, अशी त्यांना जाणीव झाली की आपण दरिद्री आहोत असं त्यांना वाटेल. पण बाजारी अर्थव्यवस्थेपासून फारच थोडे लोक पूर्णपणे अलिप्त आहेत. अरुणाचल प्रदेशातल्या काही संरक्षित जागा सोडल्या तर कोणतेच संरक्षित क्षेत्र बाजारी अर्थव्यवस्थे-पासून फारसे दूर नाही. अरुणाचलमध्येही दररोज शेकडो ट्रक अति-पुरातन जंगलातील महाकाय वृक्ष तोडून दिल्ली-मुंबईच्या बाजारात जाताना दिसतात. स्थानिक जनतेने जंगलातील त्यांचे हक्क इतरांना विकले आणि शासन-यंत्रणेनेही अशा गोष्टींना उत्तेजन दिले की जंगलांचा केवढा नाश होतो, हे अरुणाचलमध्ये सतत अनुभवास येते. अरुणाचल-च्या अतीव दुर्गम भागातही आज सॉ मिल्स चालताना दिसतात.

१८२६ च्या सुमारास ब्रिटिश सरकारने रत्नागिरी जिल्ह्यात जंगलांच्या स्थानिक मालकांना बाजारी अर्थव्यवस्थेशी जोडून दिले. त्यानंतर सतत वीस वर्षे रत्नागिरी बंदरातून जहाजे भरभरून जंगलचा माल मुंबईला जात राहिला व जिल्ह्यातली जंगले साफ झाली.* स्थानिक जमातींना बाजारी अर्थव्यवस्थेपासून अलिप्त ठेवणे (म्हणजेच त्यांना जैविक विविधतेचा एक भाग समजणे) आजच्या जमान्यात शक्य होणार नाही. (* रत्नागिरी जिल्हा गॅझेटिअर, सुधारित आवृत्ती १९६२ पृ. ३४).

माणसाच्या गरजा सतत वाढतीत राहणे, हेच आजच्या बाजारी अर्थव्यवस्थेचे ध्येय आहे. आधुनिक शिक्षणही या अर्थव्यव-स्थेचीच री ओढते. स्थानिक जनता या शिक्षणात जसजशी सामील होईल, तसतशी ती बाजारी व्यवस्थेच्या अधिकाधिक कह्यात जाईल.

राबाच्या शेतीसंबंधीचा मानवतावादी संरक्षकांचा दृष्टिकोन शास्त्रीय पायावर आधारीत आहे असे वाटत नाही. राबाच्या शेतीखालच्या जमिनीला पडित राहण्याचा कालावधी दीर्घ असेल (१५ ते २० वर्षे) तर हा.

शेतीचा प्रकार सर्वात चांगला (सस्टेनेबल - चिरंजीवी(?)) समजण्यात येतो. जमिनीची सुपीकता, मगदूर, टिकण्याच्या दृष्टीने हे जरी खरे असले तरी जैविक विविधता टिकविण्याच्या दृष्टीने ते बरोबर नाही. खरं तर वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा व किंमती यांमुळे असा दीर्घ काळानंतरी रानाच्या शेतीत कुठेच पाळला जात नाही. मुळात, जुने जंगल शेतीसाठी तोडले गेले तर वीस-पंचवीस वर्षांत त्याची जागा दुय्यम प्रतीचे जंगल घेते (सेकंडरी फॉरेस्ट). मूळच्या जंगलाचे पुनरुज्जीवन अशा थोड्या कालावधीत होत नाही. मूळच्या जंगलाबरोबरच त्यातील कीटक, प्राणी, पक्षी यांची विविधता नष्ट होते. दुय्यम प्रतीच्या जंगलातील जैविक विवि-धतेचे स्वरूप तर जरा मूळच्या जैविक विविधतेपेक्षा निराळे व कमी प्रतीचा असतो. जिथे रानाची शेती अनेक वर्षे चालू आहे, तेथे मूळच्या जंगलातील जैविक विविधता आढळत नाही. सह्याद्रीत मूळचे जंगल जिथे जिथे थोडे फार शिल्लक आहे, अशा जंगलांचा मी जो अभ्यास केला त्यात आढळले की या जंगलांतील पक्षी-जीवन आजूबाजूच्या दुय्यम प्रतीच्या जंगलातील पक्षीजीवनापेक्षा खूप निराळे आहे. ही जंगले झपाट्याने आकुंचन पावत असल्याने केवळ त्यातच आढळू शकणाऱ्या २५ पक्षी-जाती सह्याद्रीतून आता नामशेष होऊ लागल्या आहेत. रानाची शेती चालू देणे हे जैविक विविधता संरक्षित करण्याच्या उद्दिष्टाशी पूर्णतः विसंगत आहे.

संरक्षित क्षेत्रात सतत वाढणाऱ्या पाळीव जनावरांच्या संख्येचे काय करायचे, हा प्रश्नही मोठा गहन आहे. मेनका गांधी पर्यावरण राज्य-मंत्री असताना पाळीव जनावरांसंबंधी राष्ट्रीय धोरण (नॅशनल कॅटल पॉलि-सी) असावे असे मी सुचविले होते व ते त्यांना मान्य झाले होते. त्यानंतर राष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाला विचार झाल्याचे दिसत नाही. क्षेत्रफळाच्या मानाने जनावरांची, विशेषतः उत्पादनक्षम नसणाऱ्या जनावरांची संख्या जास्त आहे, असे अनेकांचे मत आहे. दर कुटुंबामागे जनावरांची संख्या मर्यादित असावी, अतिरिक्त जनावरे सरकारने शेतकऱ्यांकडून विकत घ्यावी, अशी योजना डॉ. बोर्जेस भिमाशंकरसाठी सुचवितात. उत्तर प्रदेशातल्या राजाजी राष्ट्रीय उद्यानात राहण्याचा व गुरे चारण्याचा गुजर लोकांना हक्क बिटू सहगल मान्य करतात पण त्यांच्या संख्येवर नियं-त्रण ठेवायचे की नाही, कसे ठेवायचे, याची निश्चित योजना मांडीत नाहीत, अनेक बाबतीत संशोधन झाले पाहिजे, असे म्हणतात. राजाजी-च्याबद्दल मुख्य प्रश्न असा दिसतो की बाजारी अर्थव्यवस्थेपासून गुजर लोक अलिप्त राहू शकतील का? त्यांना तसे ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्यांना विकासापासून वंचित ठेवणे, असं समजलं जाणार. गीर राष्ट्रीय उद्यानातील मालधारी गवळ्यांना प्रश्न याच सतावत आहे. महाराष्ट्रासकट इतर राज्यांतही संरक्षित क्षेत्रात राहणाऱ्या स्थानिक

जनतेला प्रत्ययही असाच आहे." बाजारी अर्थव्यवस्थेशी जशी त्यांची जवळीक वाढत आहे, तसे त्यांच्या जीवनपद्धतीत हळू किंवा वेगाने परिवर्तन होत आहे ही क्रिया थांबविणे किंवा तिला उलटी दिशा व गती देणे शक्य होईलसे वाटत नाही.

मात्र सध्याचे चित्र असे दिसते की निसर्ग-संरक्षणाचे पुरस्कर्ते आणि मानवतावादी संघटना यांच्यात, संरक्षित क्षेत्रातील स्थानिक जनतेला, तेथील जैविक उत्पादनावरचा हक्क मान्य केला पाहिजे, यावर हळूहळू एकमत घडून येत आहे. जनतेलाच संरक्षित क्षेत्रे नको असतील तर आम्ही तरी त्यात आडकाठी कशाला करायची, असे म्हणत शासनही त्यांचे संरक्षण काढून घ्यायला टपून बसले आहे, असेही चित्र काही ठिकाणी दिसते. वन्य प्राण्यांच्या दृष्टीने मात्र या घटना दुर्दैवी म्हटल्या पाहिजेत. मी स्वतः काही आदिवासी आणि स्थानिक जनता यांच्या विरोधी नाही. पण मला असं वाटतं की निसर्ग-संरक्षक आणि मानवतावादी संघटना या दोघांनीही आपला खरा शत्रू ओळखलेलाच नाही. उलट आज आधुनिक अर्थव्यवस्था अल्पसंतुष्ट, समाधानी मानवी समाजांवर जो अन्याय करीत आहे, तोच अन्याय या समाजांच्या पाठीराख्या संघटना अल्पसंतुष्ट, समाधानी व स्वतंत्र वृत्तीच्या वन्य जीवांवर करीत आहेत, असे म्हणता येते. निसर्ग-संरक्षक व मानवतावादी संघटनांनी एकजूट करून त्यांचा खरा शत्रू जो आधुनिक अर्थव्यवस्था, तिच्यावर प्रहार केले पाहिजेत, वन्य जीवांवर नव्हे.

शिवाय आज ज्या निसर्ग-संरक्षणाच्या आणि जनतेच्या हक्कांच्या मागण्या करण्यात येतात, त्या फार कच्च्या शास्त्रीय पायावर आधारीत आहेत, असे म्हणावे लागते. निसर्ग-संरक्षणाच्या दृष्टीने पाहता, काही मोठे प्राणी व काही अति दुर्मिळ प्राणी व पक्षी यांचा अभ्यास झाला असला तरी, निसर्गातील निरनिराळ्या परिसंस्था, त्यांतील घटकांचे परस्परावलंबन, निरनिराळ्या वन्य जीवांना कपाट्या ढोलीचे आसरे लागतात, त्यांतील त्यांचे अन्न म्हणून वापरले जाणारे अत्यावश्यक घटक कोणते, त्यांचे प्रजोत्पादन यशस्वी होण्यास कोणती परिस्थिती लागते, निरनिराळ्या घटकांच्या संख्येतील प्रासंगिक व मोसमाप्रमाणे होणारे चढउतार अशा अनेक गोष्टींची, संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यास आवश्यक अशी शास्त्रीय माहिती आपल्याकडे उपलब्ध नाही. संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यासाठी आधी शास्त्रीय संशोधनाचे सुसूत्र धोरण आखले पाहिजे, ही जाणीव कोठेही दिसत नाही. वर्षातील बाराही महिने व्यवस्थापनास उपयुक्त अशी शास्त्रीय माहिती गोळा करण्याचा उपक्रम कोणत्याही संरक्षित क्षेत्रात चालू नाही. अशा उपयुक्त माहितीच्या अभावामुळे जैविक विविधतेच्या रक्षणाला आणि भविष्यकालीन संरक्षणासाठी आज राखून

टिकवलेले क्षेत्र पुरेसे आहे की नाही, त्यांची संख्या वाढल्यास ते क्षेत्र पुरे पडेल का, किंवा आज जे अतिसंरक्षित क्षेत्र समजण्यात येते, तो भाग खरोखरच या दर्जाचा आहे का, हे नक्की सांगणे कठीण आहे.

सामाजिक बाजूचा विचार करतां असे दिसते की वन्य जमाती व जंगले यांच्यातील परस्परावलंबनाचा अभ्यास फार थोडा झालेला आहे. आज-मितीस हे लोक जंगलांवर कोणत्या प्रकारे व किती अवलंबून आहेत, तसेच जंगलांपासून ते किती वेगाने विलग पडत आहेत, बाजारी अर्थव्यवस्थेशी त्यांचा सांधा कोणत्या प्रकारे व कसा जोडला जात आहे, त्याचे नेमके परिणाम त्यांच्या जीवनपद्धतीवर कसे होत आहेत, या जमातीतील कुटुंबव्यवस्था, वर्ग व वर्ण व्यवस्था, बदलल्या आहेत का? किती प्रकारे? या जमाती एकसंध आहेत का त्यांच्यात अंतर्गत फरक, विषमता आहे? संरक्षित क्षेत्रातील जैविक उत्पादना-मध्ये त्यांचा वाटा किती ठरवायचा, त्यात भविष्यकाळात कसा बदल होईल व करायचा, निरनिराळ्या जमातींमध्ये त्याचे वाटप कसे करायचे? याबाबतीत एखादी शिरजोर जमात किंवा खेडे इतरांचा वाटा हिरावून घेऊ लागल्यास काय करायचे? (रणथंभोर क्षेत्रात अशी घटना घडली आहे). शासनाच्या ग्रामविकास योजना संरक्षित क्षेत्रात राबविल्यास त्यांचे परिणाम कोणते होतील? त्यांपैकी कोणत्या राबवायच्या व कोणत्या नाहीत, अशा अनेक गोष्टींची शहानिशा, अभ्यास अजून व्हावयाचा आहे.

DONG 4

या सर्व प्रश्नांची शास्त्रीय पायावर सोडवणूक करायची तर मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय माहिती गोळा करावी लागेल. हे काम प्रचंड खर्चाचे आणि वेळ खाणारे आहे. ते पूर्ण होईतो, आजची परिस्थिती अशीच चालू राहिली तर, चार दशकांतच या चिमुकल्या क्षेत्रफळाचा तोंडवळा एवढा बदलून जाईल की त्याची ओळखच पटणार नाही. मानवी प्रभावाखाली हे क्षेत्र अधिकाधिक येत जाईल, यात मला तिळमात्र संशय नाही. उत्क्रांती-नुसार विकसित झालेल्या निसर्ग-व्यवस्थांची जागा मानवी व्यवस्थापनाखालील निसर्ग-व्यवस्था घेतील. परिणामी जैविक विविधतेत मोठ्या प्रमाणावर घट होईल.

जागतिक स्तरावर ही क्रिया केव्हाच सुरू झालेली आहे. या प्रक्रियेची गति किंवा परिमाण तरी काय आहे? हे समजण्यासाठी पुढील माहिती पहा. पृथ्वीच्या इतिहासात जागतिक पातळीवर, प्रचंड प्रमाणावर जैविक विविधता नष्ट होण्याची घटना आजवर चार-पाच वेळा तरी घडलेली आहे. यांपैकी जनमानसावर ज्या घटनेने विलक्षण पकड बसविली आहे, ती घटना म्हणजे डायनोसॉर हे महाकाय प्राणी नष्ट झाले तो कालावधी होय. मात्र ही घटना अणु-परमाणू शस्त्रांच्या युद्धाप्रमाणे काही क्षणात किंवा काही वर्षांत होऊन गेलेली नाही. डायनोसॉरबरोबर इतर जीवन नष्ट होण्याची क्रिया सुमारे पन्नास हजार वर्षे चालू होती, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. जैविक विविधता नष्ट होण्याच्या प्रत्येक घटनेनंतर जैविक विविधता पृथ्वीवर पुन्हा प्रस्थापित होण्यासाठी लाखो वर्षांचा काळ जावा

लागला. डायनोसॉर ज्या वेगाने नष्ट झाले, त्यापेक्षा आज जीव नष्ट होण्याचा वेग कितीतरी अधिक आहे. डायनोसॉर नष्ट झाले त्या काळा-नंतर माणूस पृथ्वीवर वावरू लागला त्या काळापर्यंत पृथ्वीवरून सरासरी दर हजार वर्षांस एक प्राणीजात नष्ट होत होती. १६०० सालापर्यंत हाच वेग साधारणपणे कायम होता. १६०० ते १९०० या ३०० वर्षांत ७५ प्राणीजाती नष्ट झाल्या. १९६० पर्यंत आणखी ७५ प्राणीजाती पृथ्वी-तलावरून नामशेष झाल्या. १९६० सालानंतर हा वेग प्रचंड वाढून दर वर्षी १००० जाती पृथ्वीवरून नष्ट होऊ लागल्या. विषुववृत्तीय जंगलांचा ऱ्हास झपाट्याने होत असल्याने येत्या काही वर्षांत हा वेग इतका प्रचंड होईल की दरवर्षी ४०,००० जाती नामशेष होतील, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. म्हणजे यापूर्वी जैविक विविधता नष्ट होण्यास ५०,००० वर्षे लागायला पाहिजेत, ती काही शेकडा वर्षांतच नष्ट होईल! (संदर्भ: नॉर्टन बी. जी.: व्हाय प्रिझर्व नॅचरल व्हरायटी? प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, प्रिन्स्टन, न्यू जर्सी, यू.एस.ए. १९८७, पृष्ठ ६५).

वन्य प्राणी नष्ट होण्याचा हा वेग थोपविता येईल का? आपले वन्य प्राणी आणि वनस्पती यांना वाचविता येईल का? विशेषत: आदिवासी आणि इतर अल्पसंतुष्ट परंपरा असलेल्या जमातींची संस्कृती टिकून धरून हे शक्य होईल का? मला वाटते होईल — जर निसर्ग-संरक्षक व मानवतावादी संघटना यांनी एक होऊन आपली बुद्धी, परिश्रम व संघटनात्मक बळ पणाला लावले तर! मात्र त्यांनी शिल्लक उरलेल्या ४ टक्के नैसर्गिक भागावर व त्यातील जैविक उत्पादनावर हक्क सांगण्याऐवजी ~~[illegible]~~ २५ टक्क्यासारख्या प्रचंड भू-भागातला हिस्सा मागितला पाहिजे. त्यांपैकी कित्येक चौरस किलोमीटर भूभाग हा पुन्हा निसर्ग-व्यवस्थेखाली आणला पाहिजे.

म्हणूनच मी सुचवितो आहे, एक प्रचंड, राष्ट्रव्यापी, श्रम-शक्तीवर आधारलेली, अनेकांना रोजगार पुरवू शकणारी, लोकांच्या सह-भागावर आणि विकेंद्रित व्यवस्थापनावर चालणारी नैसर्गिक पुनरुज्जीवनाची योजना.

अण्णासाहेब हजारे यांच्यासारख्या स्वार्थत्यागी लोकांनी त्यांच्या "आदर्श गावा"च्या संकल्पनेनुसार अशा प्रकारच्या विकेंद्रि-करणाला सुरुवात केलेली आहे. मात्र त्यांच्या योजनांना नैसर्गिक पुनरुज्जीवनाची भरभक्कम जोड द्यायला पाहिजे. म्हणूनच प्रत्येक गाव हे त्याच्या आजूबाजूच्या निसर्गाचा अविभाज्य भाग बनले पाहिजे; गावाच्या प्राथमिक, मूलभूत गरजा जशा आजूबाजूच्या निसर्गातून भागविल्या पाहिजेत, तसेच या निसर्ग-व्यवस्थेत समाविष्ट होणारे वन्य जीव यांच्या गरजाही त्यातून भागविल्या जाव्या. आज जो ४ टक्के भाग थोड्या फार नैसर्गिक स्थितीत शिल्लक आहे, त्याकडे

जैविक विविधतेला साठा अथवा निधी असे पाहिले जाते. नैसर्गिक पुनरुज्जीवनाचे कार्य माणसाने झाडे लावून किंवा लागवड करून होत नाही. त्यासाठी जैविक विविधतेला साठा जवळपास हवा. या साठ्यातून बीजकणांचे जे नैसर्गिकरीत्या वितरण होते, त्यास पुरेसे संरक्षण मिळाले की नैसर्गिक पुनरुज्जीवनाच्या क्रियेस गती मिळते. माणसांची आणि पाळीव जनावरांची संख्या कमी करून, त्यांचा हस्तक्षेप मंदावून हे शक्य होते. लोकांच्या सहभागावर आधारित, विकेंद्रित व्य-वस्थापनामुळे कुटुंबनियोजनास चालना मिळेल, भाराभर जनावरांच्या संख्येवरही नियंत्रण येईल आणि मग वन्य जीवांच्या संख्येवर शिकारीद्वारे नियंत्रण ठेवण्याचा हक्क माणसाला प्राप्त होईल. शिकारी प्राणी-पक्षी, गवत खाणाऱ्या प्राण्यांची संख्या जशी मर्यादित ठेवतात, तीच भूमिका माणूस बजावू शकेल. शिकार ही सुद्धा शास्त्रीय माहितीवर आधारीत असेल.

माणसाच्या आर्थिक प्रगतीसाठीही निसर्गाचा पाया व आधार भक्कम हवा, हे मान्य करण्यास कोणालाही अडचण येऊ नये!

अशा राष्ट्रव्यापी योजनेस जमीन आणि निधी कोठून उपलब्ध होईल? माणसाने उपयोगात आणलेल्या दहा टक्के भूभागात वाया गेलेली जमीन खूप आहे. काहींच्या मते या जमिनीचे क्षेत्रफळ ५० टक्के एवढे मोठे आहे. यामध्ये धरणांसारखे मोठे प्रकल्प, मोठे कारखाने व त्यांच्या प्रभावाखालील क्षेत्र, चुकीच्या व्यवस्थापनामुळे खाणी व तसेच उद्योगांमुळे निकामी झालेले क्षेत्र, अशी अनेक क्षेत्रे येतात. चुकीच्या धोरणांमुळे लोकसंख्या वाढली, त्याप्रमाणात रोजगाराची संधी न वाढल्याने या वाढत्या लोकसंख्येचा भार शेतीवर पडला, त्यामुळे शेतीयोग्य नसलेली जमीनही शेतीखाली आली आणि या लोकसंख्येच्या प्राथमिक गरजा पुरविणारी अर्थव्यवस्थेत सोय नसल्याने लाकूड, जळण, चारा यासाठी कितीतरी क्षेत्र ओरबाडले गेले. शेतीस अयोग्य अशा जमिनींवरची शेती हळूहळू कमी करून तिथे कुरणे, काष्ठवने, वन-शेती यांना उत्तेजन दिले तरही नैसर्गिक पुनरुज्जीवनास हातभार लागेल. धरण-योजना आणि उपसा सिंचन योजना यांमुळे बहुतेक नद्यांची पात्रे आज मृतवत झालेली आहेत. त्यांचे नैसर्गिक पुनरुज्जीवन करूनही ही योजना राबविता येईल. असे पुनरुज्जीवन प्रगत राष्ट्रांमध्ये सुरू झाले आहे. निसर्ग-पुनरुज्जीवनाचे शास्त्र व तंत्र झपाट्याने प्रगत होत आहे. निसर्गाच्या सर्वंकष अभ्यासाला चालना देऊन आपल्या परिस्थितीनुरूप हे तंत्र आपल्याला राबविता येईल.

कोणतीही नवीन योजना पुढे आणली की तिला पैसा कोठून आणायचा? हा शासनकर्त्यांना ठराविक प्रश्न असतो. उलट एखादी योजना राजकारणी व सत्ताधारी लोकांना आवडली की तिला-

साठी पैसा ते कंत्राटी व कसारी उभा करतात, हे आपण नेहमीच पहातो तेव्हा पैसा उभा करता करायचा, हा प्रश्न माझ्या मते गौण आहे. मात्र सामाजिक व राजकीय पातळीवर अशी योजना मान्य झाली पाहिजे. प्रत्यक्ष सत्ता ही लोकशाहीतही नाही मूठभर लोकांच्याच हातांत असते. तिथे ही योजना पोहोचून मान्य झाली पाहिजे किंवा त्यांच्यावर एवढे सामाजिक दडपण आले पाहिजे की अशी योजना मान्य केल्याशिवाय त्यांना गत्यंतर नाही. मग पैसा कोठून आणायचा, हा प्रश्नच उभा रहायला नाही.

तेल सत्ताधारी आज यंत्रसामग्री, कच्चा माल, बीज, पाणी, खते, शेतमाल यांच्या वापरास उत्तेजन देण्यासाठी प्रचंड अर्थसहाय्य देत असतात. त्याचा फायदा मोठे कारखानदार व बडे शेतकरी यांना होतो हे सर्वज्ञात आहे. या अर्थसहाय्यामुळे आणि भांडवल बाजारात प्रचंड उलाढाली करून तेल सत्ताधारी ~~आहे~~ आज जीवनावश्यक नसलेल्या गोष्टींच्या उत्पादनावर आधारित अर्थव्यवस्था अंमलात आणीत असतात. जीवनावश्यक नसलेल्या गोष्टींच्या उत्पादनात गुंतलेला हा पैशाचा प्रचंड ओघ जर या योजनेसाठी वळवायचा तर आर्थिक व राजकीय शहाणपण व धोरणीपणा मात्र अवश्य हवा.

जीवनावश्यक नसलेल्या वस्तूंच्या उत्पादनात मोठी भांडवली गुंतवणूक करू पाहणारी आजची अर्थव्यवस्था हीच निसर्ग-संरक्षक व मानवतावादी संघटना यांची खरी शत्रू आहे. आपसातील भांडणे मिटवून त्यांनी या समान शत्रूशी लढा दिला पाहिजे.

प्रारंभी माझ्या मनात उभ्या राहिलेल्या प्रश्नाचे उत्तर मला वाटतं, आता असे देता येईल : माणसाच्या उत्क्रांतीला आजच्या रूपात पाहता, त्याला जैविक विविधतेचा (वनस्पती-प्राण्यां-सारखा) भाग मानता येणार नाही. आपली बुद्धी आणि तंत्रशक्ती यांच्या जोरावर त्याने आपले विश्व (रिआल्म - किंगडम् - जसे ॲनिमल किंगडम्, प्लँट किंगडम्, तसे ह्युमन किंगडम्) निर्माण केले आहे. डायनोसॉरचा प्रचंड आकार त्याच्या शरीराला लाभला तरी ~~त~~ त्याच्या तंत्रशक्तीचे बळ पाहिले की डायनोसॉरचाच हा नवा अवतार असावा अशी शंका येते. मात्र त्याचे हे विश्वातील अधिराज्य सृष्टीच्या साम्राज्याचाच एक भाग आहे. वनस्पती व प्राणी यांची अधिराज्ये हे या साम्राज्याचे इतर भाग. माणसासकट ही सारी राज्ये अजून तरी सृष्टीचे मांडलीक आहेत. हे मांडलिकत्व झुगारून देण्याला माणूस सतत प्रयत्न करीत आहे. पण त्यामुळे त्याचे अस्तित्व धोक्यात येणार अशी आज परिस्थिती आहे. या सर्व अधिराज्यांनी गुण्यागोविंदाने रहाण्यातच सर्वांचे आणि विशेषत: माणसाचे हित दिसते.

प्रकाश गोळे
१ब अभिमानश्री सोसायटी
पुणे ४११००८